# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१८ / आषाढ २९, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

**नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील महापारेषण कंपनीच्या सबस्टेशनमध्ये झालेला स्फोट**

**(१) * १२३६१७ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील महापारेषण कंपनीच्या सबस्टेशनमध्ये दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन ८ जण जखमी झाले असून ४ जणांची प्रकृती चिंताजनक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, या स्फोटात जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय व आर्थिक मदत देण्याबाबत व दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील महापारेषण कंपनीच्या २२०/२२ के.व्ही. धानीव (नालासोपारा) सबस्टेशनमध्ये झालेल्या विद्युत अपघातात १० व्यक्ती जखमी झाले असून त्यापैकी ८ महावितरण कंपनीचे, १ महापारेषण व १ खाजगी ठेकेदाराचा कर्मचारी आहे. सदर जखमी कर्मचाऱ्यांपैकी ९ कर्मचाऱ्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले असून एका कर्मचाऱ्यास पुढील उपचारासाठी नॅशनल बर्न सेंटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
(२) विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग क्र.१ ठाणे यांनी सदर अपघाताची चौकशी केली आहे. सदर प्रकरणी एचटी केबलचे मेगर घेण्यास गेलेले संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचा निष्काळजीपणा सदर अपघातास कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) सदर स्फोटात जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी तातडीची आर्थिक मदत प्रत्येकी रु.२०,०००/- देण्यात आलेली आहे. तसेच महावितरण कंपनीच्या मेडीक्लेम पॉलिसी अंतर्गत त्यांचे उपचार वसई येथील गोल्डन पार्क इस्पितळात चालू होते. तसेच सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द विभागीय शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद शाळांमध्ये सोलार पॅनल बसविण्याबाबत

**(२) * १२१६७४ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक अशा एकुण १०९३ शाळा असून त्यातील ५३० शाळांमध्ये ई-लर्निंग उपक्रम सुरु असून १९३ शाळांवर याकामी सोलार पॅनल बसविण्यात आलेले आहेत व उर्वरित ९०० शाळांना २ केव्हीचे सोलार पॉवर पॅनल बसविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांना डिजीटल बनविण्यासाठी सोलार पॅनल बसविणे आवश्यक असताना त्यासाठी निधीची कमतरता असून उक्त निधीची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) जिल्हा परिषद, उस्मानाबाद मार्फत सन २०१४-१५ व २०१५-१६ या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत एकूण १२१ प्राथमिक शाळांवर १ कि.वॅ. क्षमतेचे रुफ टॉप सोलार पॅनल महाऊर्जाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली बसविण्यात आले आहेत.

उपाध्यक्ष, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दि. २४/४/२०१८ च्या निवेदनाव्दारे ९०० शाळांना २ कि. वॅटचे सोलार पॅनल बसविण्यासाठी रू.१२ कोटी निधीची मागणी केली आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद यांनी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची/अनुदानाची मागणी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानपाडा रस्त्यावरील (ता.कल्याण, जि.ठाणे) गांधारी नाल्यावर असलेल्या पुलाचे काम पुर्ण करण्यासाठी विज वाहिन्या स्थलांतरित करणेबाबत

**(३) * ११७३२९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानपाडा रस्त्यावरील स्टार कॉलनी सागाव (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील गांधारी नाल्यावर असलेला पूल हा सुमारे ५० वर्षांपूर्वीचा असून सद्यःस्थितीत अत्यंत अरुंद व धोकादायक झाल्याने त्याचे निष्कासन करुन तेथे १६ मीटर रूंदीचा पूल उभारण्याचे काम सुरु झाल्यामुळे या पुलावरील वाहतुक बंद ठेवून इतरत्र वळवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलावरील उजव्या बाजूने महावितरण तसेच रिलायन्स कंपनीच्या उच्च दाबाच्या वीज वाहिन्या जात असून या वाहिन्या हटविल्याशिवाय हे काम पूर्ण करणे शक्य नसल्याने ठेकेदाराने महावितरणला या वीजवाहिन्या स्थलांतरित करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर महावितरणने वाहिन्या स्थलांतरित करण्याचे काम त्यांचे नसल्याचे सांगितल्याने सदर पुलाचे काम अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणाच्या या निर्णयामुळे पावसाळयात नागरिकांना त्रास सहन करावा लागणार असून या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पूल त्वरित उभारण्याकरीता वाहिन्या स्थलांतरित करण्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने महावितरणच्या विभागीय कार्यालयाकडे अर्ज केला होता.

(३) व (४) महावितरणच्या वाहिन्या व पोल स्थलांतरीत करण्यात आले असून उजव्या बाजूच्या पूलाचे काम पूर्ण झाले आहे. सदरील पूल दिनांक ०५.०७.२०१८ पासून वाहतूकीस सुरु करण्यात आला आहे. परंतु पुलाच्या पश्चिम बाजूस असणाऱ्या भूमिगत उच्चदाब वाहिन्या सुध्दा स्थलांतरीत करणे गरजेचे असून त्या स्थलांतरीत करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने संमती दर्शविलेली नाही. त्यामुळे सदरचे काम प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पूर्णा नागरीक सहकारी बँक मर्यादित, बीड (ता.आष्टी, जि.बीड) या सहकारी बँकेतील वित्तीय अनियमिततेबाबत

**(४) * १२५७१६ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडा सहकारी साखर कारखाना (ता.आष्टी, जि.बीड) हा पूर्णा नागरीक सहकारी बँक मर्यादित, बीड या सहकारी बँकेचा सभासद नसतांना तसेच या कारखान्याने कर्ज मंजूर करुन घेतांना कसलेही तारण दिलेले नसतांना ३० लक्ष रुपयांचे टर्म लोन बँकेने मंजूर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कारखान्याच्या ३० लक्ष रुपयांच्या नियमबाहय कर्जाचे निर्लेखन करण्यात आले आहे असा अहवाल तत्कालीन चौकशी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी शासनास सादर केला असून आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी चौकशी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सहकारी बँकेतील वित्तीय अनियमिततेबाबत माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये सहकार आयुक्त व निबंधक यांना तक्रार प्राप्त झाली असून बँकेने नगर रोड येथील जागेचे (दुय्यम निबंधक बीड-१ यांचेकडील नोंदणी दस्त क्र.४३२४/२०१७) बाजार मुल्य रु.६१,२५,५०० असतांना रु.१,३४,७३,००० इतक्या किंमती मध्ये खरेदी करून रक्कम रु.७३,४७,५०० रकमेचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक मे.व्ही.बी.वालवडकर ॲन्ड कंपनी तसेच चार्टर्ड अकाऊंटंट प्रा.विजय बी. वालवडकर यांनी उक्त बाजारमुल्या प्रकरणी वैधानिक लेखापरिक्षणावेळी आक्षेप न नोंदविता सदर व्यवहारास संमती देऊन वित्तीय अनियमितता उघड न केल्याप्रकरणी शासनाने त्यांची चौकशी केली आहे काय,

(५) तसेच प्रश्न भाग २ मधील नियमबाहृय कर्जाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर जबाबदार अधिकारी व बँकेचे तत्कालीन संचालक मंडळाची देखील शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई या बँकेने कडा सहकारी साखर कारखान्यात उत्पादीत होणा-या साखरेच्या प्रत्येक पोत्यासाठी रु.२० प्रमाणे कपातीची हमी दिलेली असल्याने पूर्णवादी नागरीक सहकारी बँकेने कडा सहकारी साखर कारखाना ता.आष्टी, जि.बीड या साखर कारखान्यास दिनांक ६.११.२००१ रोजी रु.३० लक्ष कर्ज मंजूर केले. त्यानुसार राज्य सहकारी बँकेकडून पुर्णवादी बँकेस रु.८,८४,०००/- इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे.

(२) सदर कर्जखाते एन.पी.ए. वर्गवारीमध्ये समाविष्ट झाल्याने, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेने दरवर्षी नफ्यातून या खात्यासाठी तरतूद केली असून दि.३१/३/२००७ अखेर सदर कर्जाच्या १००% तरतूद पुर्ण झाली. तद्नंतर सदर कर्जखाते वसुलीचे सर्वाधिकार अबाधित ठेऊन दि.२४/३/२००९ रोजी निर्लेखीत केले आहे.

(३) व (४) बँकेने शाखा नगररोड, बीड या शाखेसाठी २४०० चौ. फुट क्षेत्रफळाची जागा दि.४/१०/२०१७ रोजीच्या खरेदी दस्तान्वये रु.१,३५,००,०००/- इतक्या रकमेस खरेदी केली.

कोणतीही जागा/मालमत्ता खरेदी करताना ती जागा दुय्यम निबंधक/ सार्वजनिक बांधकाम विभागाची जिल्हा दर सुचीनुसार निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दरात मिळणे सहज शक्य नसल्याने अशा जागा/मालमत्ता

खरेदी करताना शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकाराने निश्चित केलेल्या मुल्यांकनानुसार जागा/मालमत्ता खरेदी करण्यास सहकार आयुक्तांनी दि.३१/१०/२०१२ च्या परिपत्रकान्वये परवानगी दिली आहे.

त्यानुसार बँकेने शासनमान्य मुल्यांकनकाराकडून प्राप्त झालेले मुल्यांकन रु.१,३५,००,०००/- नुसार जागा खरेदी केली आहे.

(५) बँकेने कडा सहकारी साखर कारखान्यास दिलेले कर्ज व त्याचे निर्लेखन या मुद्द्यांबाबत सहकार आयुक्तांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी प्राधिकाऱ्याची दिनांक २७.६.२०१३ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिनांक ७.८.२०१४ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या विरुद्ध संबंधीत बँकेने मा. मंत्री (सहकार) यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला असून मा.मंत्री (सहकार) यांनी दिनांक १०.५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर चौकशी अहवाल रद्द केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया येथील लिटील फ्लॉवर इंग्लीश मिडीअम स्कुल या शाळेमध्ये शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(५) * १२१०९२ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने नामांकित इंग्रजी माध्यम शाळा प्रवेशाच्या योजनेतंर्गत कोणतीही शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसलेल्या लिटील फ्लॉवर इंग्लीश मिडीअम स्कुल, गोंदिया या शाळेमध्ये १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, हे खरे आहे काय .

(२) असल्यास, सदर शाळेचे बांधकाम सुरु असल्याचे तसेच शाळेच्या मैदानामध्ये वाळू व लोखंडी सळया ठेवल्या असल्याचे आढळून आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे वसतीगृह एका बंगल्यात आहे तसेच एका खाटेवर २ विद्यार्थी झोपविले जातात तसेच स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नसतानाही या इमारतीत तोडफोड केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांसाठी कोणतीही सुविधा नसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेशित करणाऱ्या प्रकल्प अधिकारी, अप्पर आयुक्त यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत लिटील फ्लॉवर इंग्लीश मिडीअम स्कुल, गोंदिया या शाळेमध्ये सन २०१६-१७ मध्ये ५० विद्यार्थी आणि सन २०१७-१८ मध्ये ३७ असे एकूण ८७ विद्यार्थी प्रवेशीत करण्यात आले आहेत.
(२) वसतीगृह इमारतीचे बांधकाम सुरु असल्यामुळे वाळु व लोखंडी सळ्या ठेवल्या असल्याचे आढळून आले, ही बाब खरी आहे.
(३), (४) व (५) वसतीगृह इमारतीमध्ये विद्यार्थ्यांच्या झोपण्यासाठी २६ डबल डेकर पलंगाची व्यवस्था केली आहे. ४x६ च्या साईजचे बेड असुन त्यामध्ये दोन विद्यार्थी खालच्या भागात व दोन विद्यार्थी वरील भागात झोपण्यासाठी व्यवस्था केली आहे.

सदर शाळेमध्ये २९ वर्ग खोल्या आहेत. निवासासाठी स्वंतत्र वसतीगृह आहे. वसतीगृहांमध्ये मुलांसाठी व मुलींसाठी प्रत्येकी ७ स्वच्छतागृहे व ७ स्नानगृहे उपलब्ध आहेत. शाळेच्या आणि वसतीगृहाच्या इमारतीमध्ये २४ तास पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली आहे. मुलांना पिण्याच्या पाण्याकरिता जलशुध्दीकरण यंत्र बसविलेले आहे. शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, क्रमीक पुस्तके, गणवेश, बुट इत्यादी सोयी सुविधा शाळेद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेतील ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत

**(६) * १२३३४८ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील सुमारे १२४२ सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांकडे वीज देयकांची थकबाकी असल्याने या सर्व योजनांचा वीजपुरवठा खंडीत केला

असल्याचे दिनांक ६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी त्या गावातील नागरिकांना ऐन उन्हाळयात पाण्याची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने या योजनांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) महावितरण कंपनीची सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांकडे असलेली वीजदेयकाची थकबाकी वसूल करण्यासाठी, वेळोवेळी कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करण्यात येतो. तसेच थकीत वीज बिलाचा भरणा करण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ कलम ५६ (२) नुसार १५ दिवसांची नोटीस देण्यात येते व त्यानंतरही थकबाकीचा भरणा न केल्यास संबंधित पाणीपुरवठा ग्राहकांचा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात येतो. सदर पाणी पुरवठा ग्राहकांनी वीज बिलाचा भरणा केल्यानंतर खंडीत वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येतो.

औरंगाबाद जिल्हयात एकूण १४२४ सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांचे ग्राहकांपैकी माहे एप्रिल, २०१८ व मे, २०१८ मध्ये ६५५ लघुदाब ग्राहकांचा वीज पुरवठा थकबाकीपोटी खंडित करण्यात आला होता त्यापैकी १६१ ग्राहकांनी थकबाकीचा भरणा केल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा माहे मे, २०१८ अखेर पूर्ववत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि. १६ मे, २०१८ अन्वये सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांची माहे मार्च, २०१८ अखेरच्या मूळ थकबाकीच्या ५०% रक्कम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून नगरविकास विभागाने व ग्रामविकास विभागाने परस्पर महावितरण कंपनीला थेट अदा करावी व उर्वरित ५०% थकबाकी रक्कम सदर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महावितरण कंपनीने वसूल करावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

**(७) * १२५२८० डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे माजी आयुक्त यांनी जारी केलेल्या पत्रानुसार व चालीरीती जुळत नाहीत या कारणावरुन मराठवाड्यात कोळी महादेव व कोळी मल्हार ही जातच अस्तित्वात नाही असे ग्राह्य धरून अनुसूचित जमाती पडताळणी समितीने सन २०११ ते आजपर्यंत मराठवाड्यातील एकाही कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या आदिवासी बांधवांवर नोकरी, शिक्षण इ.लाभांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या व्यक्तींना वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) नाही. मराठवाडा विभागामध्ये जात पडताळणी समितीने सन २०११ ते आतापर्यंत कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीच्या अनुक्रमे १२१७ व १७० लोकांना वैधता प्रमाणपत्र दिलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मामेखेल बोटा (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील आश्रमशाळेतील अल्पवयीन शालेय विद्यार्थीनीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(८) * १२१४६४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मामेखेल बोटा (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील आश्रमशाळेतील १७ वर्षीय अल्पवयीन शालेय विद्यार्थीनीवर आश्रमशाळेतील शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा, जवळेबाळेश्वर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर या शाळेत मामेखेल बोटा, ता.अकोले, जि.अहमदनगर या गावातील शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थीनीने शाळेमधील रोजंदारी तत्वावर दैनिक मजूरीच्या स्वरूपात प्रयोगशाळा परिचर (गट ड) या पदाचे काम पहाणारा कर्मचारी श्री.जयराम बबन घोडे याने दि.२१/३/२०१८ रोजी लैगिंक अत्याचार केल्याबाबत पोलिस स्टेशन, घारगांव तालुका संगमनेर, जि. अहमदनगर येथे दि.२८/५/२०१८ रोजी तक्रार दाखल केली असून पोलीसांनी भां.द.वि. कलम ३७६ (१) (F) व बाल लैंगिक अत्याचार कायदा कलम ४ प्रमाणे गुन्हा क्र.७५/२०१८ दाखल केला आहे.

प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नानोशी (ता.पनवेल, जि.रायगड) गट ग्रामपंचायतीस आदिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत

**(९) * ११७४६० श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नानोशी (ता.पनवेल, जि.रायगड) या गट ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मानघर, आवळीचा मळा, मोसारे, पाटणोली, नानोशी, बेलवाडी, कामठवाडी, सांबरमाळ, गराडा या आदिवासी वाड्या ज्या ग्रामपंचायतीतंर्गत येतात त्या ग्रामपंचायतीस आदिवासी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत मा.आदिवासी विकास मंत्री यांना नानोशी ग्रामपंचायतीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वारंवार लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील स्थानिक मूळ आदिवासींच्या जागेवर अनधिकृत इमारतींचे बांधकाम केल्याबाबत

**(१०) * १२४७८५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील स्थानिक मूळ आदिवासी यांचे जागेतील सर्व्हे नं. ८६ हिस्सा नं. १/२, १/४, १/५ व १/१२ या जागेवर अनधिकृत इमारतींचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक मूळ आदिवासींच्या जमिनीवर अनधिकृत इमारतींचे बांधकाम करण्यात येत असल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, त्यांच्या जागेवर त्यांच्या नावाची बनावट कागदपत्रे बनवून विविध व्यवसाय चालू असल्याचे ही निदर्शनास आले असून उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींच्या जागेवर झालेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करून मूळ जमीन मालकांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदरची बाब एप्रिल, २०१५ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे.
(२) हे खरे नाही.

सर्व्हे नं.८६ हिस्सा नं.१/२, १/४, १/५ व १/१२ मध्ये एकूण २९ अनधिकृत बांधकामे असून यामध्ये निवासी इमारती, ४ बैठ्या चाळी, ३ तबेले व १ शाळा यांचा समावेश असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने या अनधिकृत बांधकामावर खालीलप्रमाणे कारवाई केली आहे :-

- चार नवीन (आर.सी.सी.) अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केलेली आहे.
- उर्वरीत अनधिकृत बांधकाम विकासकांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
- एकूण ५ अनधिकृत बांधकामाच्या विकासकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात आल्याचे व इतर इमारतींच्या विकासकावर गुन्हे दाखल करण्याबाबत पोलीसांना कळविण्यात आल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर जमिनीवर निवासी सदनिका, शाळा, गाळे व तबेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे निदर्शनास आले नसल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

या प्रकरणी शासनाने दिनांक ०८.१२.२०१५ तसेच दिनांक ०५.१२.२०१७ च्या पत्रान्वये सर्व सबंधितावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

तद्नुषंगाने या प्रकरणी ५ अनधिकृत बांधकामाच्या विकासकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व इतर संबंधिताविरुध्द गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

प्रस्तुत जमीन ही नविन अविभाज्य शर्तीची असून जागेवर अनधिकृत बांधकामे झाल्याने शर्तभंगाबाबतची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, वसई यांचे स्तरावर चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील आदिवासी वसतीगृहाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(११) * ११९२३४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील आदिवासी वसतीगृहाची इमारत धोकादायक स्थितीत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात उपाययोजना करावी तसेच इतर मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी दिनांक १८ मे, २०१८ रोजी ठाणे येथील आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयामध्ये आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी विद्यार्थ्यांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार आदिवासी वसतीगृहाची इमारत सुस्थितीत आणण्याबाबत व सुरक्षिततेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) विद्यार्थ्यांच्या भोजनामध्ये अळ्या आढळून आल्याने भोजन ठेकेदारावर प्रशासकीय कार्यवाही करणे, वसतीगृहाकरिता कल्याण रेल्वे स्थानकापासून नजीकच्या अंतरावर इमारत उपलब्ध करणे, भोजनासाठीची डी.बी.टी. योजना बंद करणे आणि कल्याण वसतीगृहाचे गृहपाल यांची बदली करणे या प्रमुख मागण्यांकरिता आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, कल्याण येथील विद्यार्थ्यांनी दि.१८.०५.२०१८ रोजी आंदोलन केल्याची बाब खरी आहे.

(३) जेवणात अळ्या आढळल्याचे लक्षात आल्याने संबंधित भोजन ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

कल्याण वसतीगृहाकरिता सर्व सोयी सुविधांनी युक्त इमारत भाडेतत्वावर मिळण्याबाबत वृत्तपत्रांमध्ये जाहीरात देण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. याशिवाय कल्याण वसतीगृहाकरिता इमारत उपलब्ध करून देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण यांना कळविण्यात आलेले आहे.

आहाराकरिता सुरू करण्यात आलेल्या डी.बी.टी. योजनेंतर्गत देय असलेली रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात सुरळीतपणे जमा करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे कल्याण येथील वसतीगृहाच्या गृहपालांची बदली प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेलगुर (जि.गडचिरोली) येथील राजे धर्मराव माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थीनी कुमारी माता झाल्याबाबत

**(१२) * १२०८१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील वेलगुर येथील धर्मराव शिक्षण मंडळ संचलित राजे धर्मराव माध्यमिक आश्रमशाळेतील दहावीची विद्यार्थीनी कुमारी माता झाल्याप्रकरणी अहेरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने

संस्थेला दि.१.४.२०१८ रोजी वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी संस्थेने शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर घटनेस जबाबदार असलेल्या सबंधित दोषींविरुध्द अद्याप शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यातील आश्रमशाळांमध्ये वर्षातून किमान तीन वेळा विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक असतानाही वर्षातून एकदाही तपासणी केली जात नसल्याचे प्रकरण उघडकीस आले असून शासनाने याबाबत अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(४) त्यानुसार आश्रमशाळेच्या बेजबाबदार प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी, अहेरी यांनी चौकशी केली असून त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावरून याबाबत प्रथमदर्शनी शालेय प्रशासन जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक, अधिक्षक व महिला अधिक्षिका यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.तसेच दोषी मुख्याध्यापक यांच्या दोन वेतनवाढी व अधिक्षक यांची एक वेतन वाढ रोखण्याची शिफारस चौकशी समितीने केलेली आहे.
(३) राज्यातील आश्रमशाळांमध्ये वर्षातून किमान तीन वेळा विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम, नजीकचे प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेमार्फत विद्यार्थ्यांची नियमित तपासणी करण्यात येते. प्रस्तुत शाळेवर माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या महिन्यामध्ये विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प आधिकारी यांचेस्तरावर प्राथमिक चौकशी करुन कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच पुढील सविस्तर चौकशी करणेकरीता जिल्हा महिला सल्लागार समितीस कळविण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केलेल्या नोकर भरतीमध्ये केलेली अनियमितता

**(१३) * १२०१६५ श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये नोकरी भरतीची प्रक्रिया करताना शासनाची मान्यता घेऊनच नोकरभरती करण्यात येत होती, परंतु सन २०१६ नंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी शासनाची कोणतीही मान्यता न घेता नोकरभरती करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये नोकरभरती करतेवेळी शासनाची मान्यता न घेता नोकर भरती करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच या भरतीस स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस नोकरभरतीची परवानगी नसतानाही या बँकेने दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी नोकरभरती केलेली आहे.

(२) व (३) याप्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या कार्यालयामार्फत द्विसदस्यीय

समितीमार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.३१.०५.२०१६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (१) अन्वये बँकेने केलेली भरती प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचे नमूद करून सदर सेवकांना तात्काळ कमी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर आदेशाविरूध्द बँकेने मा.मंत्री (सहकार) यांच्याकडे अपिल क्र.५४६/२०१६ दाखल केले होते. तथापि मा.मंत्री (सहकार) यांनी सदर अपिल फेटाळले आहे.

सदर विषयाबाबत मा.कामगार न्यायालय, नाशिक येथे दाखल झालेल्या दाव्याच्या अनुषंगाने बँकेने तात्पुरत्या कालावधी करीता नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना कमी करू नये आणि त्यांचेबाबत "जैसे थे परिस्थिती" ठेवावी असे आदेश दि.११.०८.२०१६ रोजी दिले आहेत. सद्यस्थितीत सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इन्स्ट्र्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी, तिडंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) या कंपनीने बेकायदेशीररीत्या टॉवर उभारल्याबाबत

**(१४) * १२५५५९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इन्स्ट्र्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी, तिडंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) या कंपनीने कळमेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता तसेच शेत जमिनीचा आर्थिक मोबदला न देता जबरदस्तीने बेकायदेशीररित्या शेतकऱ्यांच्या शेतात टॉवर उभारले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१८ च्या पहिल्या आठवडयात कळमेश्वर तालुक्यात वादळी पाऊस आल्याने शेतकऱ्यांच्या शेतात उभारलेले टॉवर कोसळल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या संदर्भात अनेक शेतकऱ्यांनी तहसिलदार, कळमेश्वर यांच्याकडे लेखी तक्रार दिल्यानंतर सुध्दा सदर कंपनीविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला तातडीने देण्याबाबत व वादळी पाऊस आल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) केंद्र सरकारच्या विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ६८ अन्वये सदर पारेषण वाहिनी उभारण्यास शासन पत्र क्र. संकीर्ण-१०१०/आर-५२/ऊर्जा-४ दि.२०.१२.२०१० अन्वये सदर कंपनीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १६४ व इंडियन टेलिग्राफ ॲक्ट, १८८५ मधील १० अन्वये अधिकार प्रदान करण्यात आल्यानुसार सदर वाहिनीची उभारणी सदर कंपनीने केली आहे. सदर पारेषण वाहिनीमुळे बाधित जमिनधारकांना यापूर्वीच नियमानुसार मोबदला देण्यात आलेला असून ती वाहिनी मार्च, २०१५ पासून कार्यान्वित झाली आहे.
(२) सदरची घटना ही कळमेश्वर तालुक्यातील नसून सावनेर तालुक्यातील आहे. जून, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वादळी पाऊस व चक्रीवादळामुळे सदर कंपनीचे सावनेर तालुक्यातील तीन मनोऱ्यांपैकी एक मनोरा कोसळला असून दोन मनोरे वाकले आहेत. टॉवर कोसळल्यामुळे वीजपुरवठा सुरु करण्यासाठी, सदर कंपनीने आणीबाणी पुनर्संचयित प्रणाली (Emergency Restoration System) चा वापर करुन वीजपुरवठा सुरळीत केला आहे व पारेषण वाहिनी पूर्ववत करण्याचे काम सुरु आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तहसिलदार, सावनेर यांनी त्यांच्या दि.१३.०६.२०१८ च्या पत्रान्वये सदर कंपनीस सूचना दिलेल्या असून कंपनीकडून नुकसान भरपाईची रक्कम देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचगणी (जि.सातारा) येथील नचिकेता एज्युकेशन व चॅरिटेबल ट्रस्टच्या आदिवासी मुलांच्या शाळेचे हस्तांतरण करण्यात येत असल्याबाबत

**(१५) * ११८६७७ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचगणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथे सन २००४ पासून नचिकेता एज्युकेशन व चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आदिवासी मुलांची शाळा व वसतीगृह चालविले जात असून शाळेतील ८६० विद्यार्थ्यांपैकी ७३५ विद्यार्थ्यांचा खर्च आदिवासी विकास विभागाकडून शिक्षण संस्थेला देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या अति कामाच्या व्यापामुळे सदर संस्थेचे व्यवस्थापन तेथील विद्यामाता एज्युकेशन फोरम रोझलन्ड इंटरनॅशनल स्कूल या संस्थेकडे सोपविण्यात येऊन माहे जून, २०१७ मध्ये तसा या दोन्ही शिक्षण संस्थांमध्ये रितसर करारनामा देखील करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर करारनाम्याचा भंग करुन मा.आदिवासी विकास मंत्र्यांचे खाजगी सचिव यांनी मा.आदिवासी विकास मंत्र्यांचे आदेश असल्याचे पत्र स्वत:चे स्वाक्षरीने दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी पाठवून शाळेच्या नावात रोझलॅण्ड इंटरनॅशनल स्कूल असा बदल करुन व त्याच नावाने बनावट खाते उघडून नचिकेता संस्थेला मिळणा-या निधीत ४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक १८ मे, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अहमदनगर येथील विद्यामाता ट्रस्टचे अभय आगरकर, प्राचार्य सुलताना शेख यांच्यासह राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांचा स्वीय सहायक तसेच पुणे येथील डीवायएसपी यांच्या पत्नीची चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या प्रधान सचिवांनी दिनांक १८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीत काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०११-१२ या वर्षापासून नामांकित शाळा योजनेअंतर्गत नचिकेता हायस्कूल, पाचगणी या शाळेमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत होता.

नचिकेता हायस्कूल, पाचगणी या शाळेचा कार्यभार रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी यांच्यामार्फत चालविण्याबाबत या दोन्ही संस्थांमध्ये दिनांक २२.०६.२०१७ रोजी करार करण्यात आला होता. सदर कराराच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी या शाळेच्या नावाने योजनेंतर्गत देय असलेली रक्कम जमा करण्यात आली आहे.

सदर कराराचे अनुषंगाने शाळेचे नचिकेता हायस्कूल हे जुने नाव बदलून रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी अशी दुरूस्ती दिनांक ३१.०१.२०१८ रोजी केली आहे.

प्रस्तुत विषय हा उक्त दोन शाळांमधील अंतर्गत बाब आहे. याप्रकरणी रोजलॅन्ड इंटरनॅशनल स्कूल, पाचगणी यांच्यामार्फत जिल्हा सत्र न्यायालय, सातारा येथे अपील क्र.७३/२०१८ दाखल केले असून याप्रकरणी मा.न्यायालयाचे आदेशानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकलूज (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील सहारा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग स्कूल व धन्वंतरी नर्सिंग स्कूल या बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवाने केलेला गैरव्यवहार

**(१६) * १२२७७७ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकलूज (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील सहारा इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग स्कूल व धन्वंतरी नर्सिंग स्कूल या बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवाने शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन विद्यार्थ्यांच्या नावे असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने तीन वर्षात ९० लाखांपेक्षा अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व असे गैरव्यवहार न होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः होय.

(३) तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी सदर बझार पोलिस स्टेशन येथे गु.र.नं.३२२/२०१८ दि.२९.०५.२०१८ अन्वये शासकीय रकमेचा अपहार केल्याप्रकरणी संस्थेच्या सचिवाविरुध्द गुन्हा दाखल केला असून संस्थेच्या सचिवास अटक करण्यात आलेली आहे. सदर बाबतीत पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलठाणा (ता.जि.औरंगाबाद) एमआयडीसीतील भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहार

**(१७) * ११८५८८ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलठाणा (ता.जि.औरंगाबाद) एमआयडीसीमधील भूखंड वाटपात गैरव्यवहार झाला असल्याची लेखी तक्रार श्रीमती कविता अर्जुन चौधरी यांनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे केली असल्याची बाब दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखलठाणा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील पी-१३ या भागातील ३५० चौ.मी.चा भूखंड मिळण्याकरीता श्री.ए.ए.चौधरी यांनी सन २००५ मध्ये अर्ज करुन भूखंड मागितला असता त्यांना भूखंड वाटप ई-निविदा पध्दतीने होईल असे सांगण्यात आले मात्र तोच भूखंड श्रीमती सुजाता राऊत यांना उद्योग मंत्री यांनी ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागाच्या नकारार्थी अभिप्रायानंतरही देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीमती सुजाता राऊत यांनी यापूर्वी अनेक भूखंड घेऊन ते परस्पर हस्तांतरीत केले आहेत तसेच ई-निविदेद्वारे भूखंड देण्याचा नियम असताना अशा प्रकारे भूखंड देऊ नये अशी वस्तूस्थिती लेखी स्वरुपात कळविल्यानंतरही मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.मंत्री यांनी हा भूखंड हस्तांतरीत करता येणार नाही अशी अट टाकून श्रीमती सुजाता राऊत यांना दिल्याची बाब तक्रारदारांनी निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे ई-निविदा न करता भूखंड परस्पर मंजूर करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

श्री.अरविंद अर्जुन चौधरी व भागीदार यांनी सन २००५ रोजी चिखलठाणा औद्यौगिक क्षेत्रात माहिती व तंत्रज्ञान उद्यानामध्ये ६७५ चौ.मी. चा भुखंड मिळणेबाबत विनंती अर्ज केला असता, दिनांक ३/५/२००५ रोजी भुखंड उपलब्ध नसल्यामुळे त्यांची विनंती महामंडळाकडून अमान्य करण्यात आली होती. तसेच श्रीमती सुजाता राऊत यांनी दिनांक २२/४/२००८ रोजी चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रात माहिती व तंत्रज्ञान उद्यानामध्ये १५०० चौ.मी. भूखंड मिळणेबाबत विनंती अर्ज केला असता, दिनांक ७/९/२०१२ रोजी, मागणी केलेल्या क्षेत्रामध्ये उच्च दाब विदयुत दाहिनी जात असल्यामुळे, भूखंड आरेखीत करणे नियोजनदृष्टया शक्य नसल्याने त्यांची विनंती अमान्य करण्यात आली होती.

त्यानंतर श्रीमती सुजाता राऊत यांनी पुनश्च केलेल्या भूखंड मागणी अर्जावर, महाराष्ट्र राज्य वीज वाहीनी खाली कमीत कमी १५ मीटर मोकळी जागा ठेऊन उर्वरित क्षेत्र ३५० चौ. मी. वाटपास योग्य असल्यामुळे सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरीने वाटप करण्यात आले आहे. सदर भूखंड मुळ नियोजनामध्ये आरेखित नव्हता.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर बाब श्री. अरविंद चौधरी यांनी लेखी निदर्शनास आणली आहे. परंतु श्रीमती सुजाता राऊत यांनी यापूर्वी वाटप झालेल्या भूखंडाचे परस्पर हस्तांतरण न करता, महामंडळाचे परवानगीने रितसर हस्तांतरण केले आहे.

(४) श्रीमती सुजाता राऊत, यांनी मागणी केलेले क्षेत्र हे मूळ आराखडयानुसार आरेखित भूखंड नसल्यामुळे निवीदा मागविण्यात आली नव्हती.

(५) व (६) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील घरडा सर्कल नजीकचे जलकुंभ वापरात आणण्याबाबत

**(१८) * ११९८०१ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील घरडा सर्कल नजीक असलेल्या सुमारे २० लाख क्षमतेचा जलकुंभ गेली ३० वर्षे विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलकुंभ वापरात आणण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जलकुंभाचा वापर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि सचिव, डोंबिवली वेलफेअर असोसिएशन यांनी मा. उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. ०९/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पाणी टंचाईच्या अनुषंगाने एमआयडीसीसह २७ गावांच्या पाणी पुरवठयासाठी वापरण्यात यावी अशी मागणी केली आहे.

(३) महामंडळामार्फत अंदाजे सन-१९८० मध्ये जलकुंभ बांधण्यात आला होता व अंदाजे ३० वर्षांपासून जलकुंभ वापरात नाही. सदर जलकुंभाचे संरचना तपासणी (Structural Audit) करणे प्रस्तावित केले आहे. संरचना अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गारखेडा (जि.औरंगाबाद) येथील भाजी विक्रेत्याने अवास्तव विज देयक आल्यामुळे केलेली आत्महत्या

**(१९) * ११६८३० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा),**

**श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात गारखेडा परिसरात राहणारे भाजी विक्रेते जगन्नाथ नेहाजी शेळके यांना एका महिन्याचे सुमारे ८ लाख ७५ हजार ८३० रुपयांचे वीज देयक आल्यामुळे दिलेले वीज देयक भरायचे कसे या चिंतेने राहत्या घरी त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बाब दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी महावितरण कार्यालयाकडे दाद मागितली असता महावितरणच्या अधिकाऱ्यांमार्फत देयक भरावेच लागेल अन्यथा मालमत्ता जप्त करण्यात येईल असे सांगितल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(४) असल्यास, याप्रकरणी अवास्तव देयक पाठविण्यास जबाबदार असलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृतांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) पोलीस एफआयआर क्र. १०७/१८ दि.११.०५.२०१८ प्रमाणे श्री.जगन्नाथ नेहाजी शेळके यांनी दिनांक ११.०५.२०१८ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केलेली आहे. श्री. शेळके यांना माहे एप्रिल, २०१८ चे ५५,५१९ युनिटचे रु.८,६४,७८१/- चे वीज देयक महावितरण कंपनीकडून देण्यात आले होते. सदरचे देयक दुरुस्तीसाठी ग्राहकाकडून

कुठलाही अर्ज अथवा तक्रार महावितरण शाखा कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तसेच ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष किंवा ग्राहक तक्रार निवारण मंच येथे सुध्दा अशी कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल केलेली नाही.

(३) महावितरणच्या देयक निर्गमित करण्याच्या प्रचलित पध्दतीनुसार नियमित वीज बिलापेक्षा अवास्तव देयक आढळून आल्यास सदर देयकाची पडताळणी करुन व त्याची योग्य दुरुस्ती करुनच ग्राहकाला वीज देयक देण्याची यंत्रणा आहे. परंतु सदर प्रकरणात ही काळजी न घेता चुकीचे देयक निर्गमित केल्यामुळे संबंधित अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहाय्यक लेखापाल व कनिष्ठ लेखा सहाय्यक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी श्रीमती भागीत्राबाई शेळके यांच्या तक्रारीवरुन गु.र.क्र.१०७/१८ कलम ३०६,३४ भा.द.वि. प्रमाणे पोलीस ठाणे पुंडलिक नगर, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल असून सदर प्रकरणी चौकशी सुरू आहे.

(४) महावितरणच्या देयक निर्गमित करण्याच्या प्रचलित पध्दतीनुसार नियमित वीज बिलापेक्षा अवास्तव देयक आढळून आल्यास सदर देयकाची पडताळणी करुन व त्याची योग्य दुरुस्ती करुनच ग्राहकाला वीज देयक देण्याची यंत्रणा आहे. परंतु सदर प्रकरणात ही काळजी न घेता चुकीचे देयक निर्गमित केल्यामुळे संबंधित अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहाय्यक लेखापाल व कनिष्ठ लेखा सहाय्यक यांना निलंबित करण्यात आले आहे. पोलीसांकडून अंतिम तपासणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याने मृताच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खासकीलवाडा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील सह्याद्री काजू प्रक्रिया आणि मद्यार्क निर्मिती सहकारी कारखाना मर्या. या संस्थेच्या शासनाकडे तारण असलेल्या जमिनीबाबत

**(२०) * १२३०७४ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासकीलवाडा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील सह्याद्री काजू प्रक्रिया आणि मद्यार्क निर्मिती सहकारी कारखाना मर्यादित कारखान्यांतील ४६८ सभासदांच्या या संस्थेमध्ये शासनाने रु.३ कोटी रुपये इतकी गुंतवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुंतवणूक केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी संस्थेकडून तारण म्हणून पडवे-माजगावं येथे १६० गुंठे जमीन घेतली असून या जमिनीच्या सात-बाऱ्यावर सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोलणर यांचेकडून रुपये २ कोटी ४५ लाख कर्ज घेतल्याचे जमीन तारण नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाला तारण देण्यात आलेल्या जमिनी सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोलणर यांच्याकडे असून सदरहू जमिनी देण्याआधी कागदपत्रांची शहानिशा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) संस्थेने सिंधुदूर्ग जि.मध्यवर्ती सहकारी बँकेकडून रु. ५० लाख कॅश क्रेडिट व रु. ५० लाख माल तारण कर्ज घेतले असून, या कर्जासाठी शासनाने काजू आणि मद्यार्क निर्मीती प्रक्रियेसाठी संस्थेस दिलेल्या भागभांडवल व कर्जाच्या परतफेडीसाठी शासनास तारण म्हणून गहाणखत केलेल्या मालमत्तेवर शासनाचा प्रथम हक्क बोजा कायम ठेऊन, बँकेचा दुय्यम बोजा करुन घेतला आहे.

(३) संस्थेने बँकेकडून कर्ज घेण्यासाठी शासनाची मान्यता न घेता दुय्यम गहाणखत बोजा नोंद करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) संस्थेकडून याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे. शासन परवानगीशिवाय केलेली दुय्यम गहाणखत बोजा नोंद तात्काळ रद्द करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाउपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदूर्ग कार्यालयास त्वरीत सादर करणेच्या सुचना संस्थेस देणेत आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील बंद असलेले उद्योग सुरु करण्याबाबत

**(२१) * १२६२५२ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आर्यन कोल वॉशरीज, (पांढरपौनी), गुप्ता कोल वॉशरीज (गोवरी), भाटिया कोल वॉशरीज (पांढरपौनी), मुर्ली ॲग्रो कंपनी (कोरपना), हरिगंगा सिमेंट कंपनी (चुनाळा) असे एकूण १० उद्योग बंद पडल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग बंद झाल्यामुळे अनेक स्थानिक कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करुन सदर उद्योग उभारण्यात आल्यामुळे तेथील नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर बंद असलेले उद्योग सुरू करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) कोणत्याही उद्योगाकडून कोलवॉश करण्याची ऑर्डर न मिळाल्याने, भाटिया कोल वॉशरीज (पांढरपौनी) सन २०११ पासून आणि गुप्ता कोल वॉशरीज (गोवरी) व आर्यन कोल वॉशरीज (पांढरपौनी) सन २०१४ पासून बंद आहेत. मुर्ली ॲग्रो कंपनी (कोरपना) हा उद्योग घटक सन २०१३ पासून आर्थिक कारणामुळे बंद असून, बँकेच्या थकीत कर्जामुळे बँकेने ताब्यात घेतला आहे. हरिगंगा सिमेंट कंपनी (चुनाळा) हा उद्योग घटक गुप्ता मेटॅलीक ॲड पॉवर लि. यांनी खरेदी केला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर उद्योगांच्या जमिनी उद्योजकांनी खाजगीरित्या खरेदी केल्या आहेत.

(४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲम्नेस्टी स्किम) सूरू केली. सदर योजना २०१३-१४, २०१४-१५ व २०१६-१७ या कालावधीत सुरु होती. प्रश्नाधीन नमूद उद्योग घटकांनी सदर योजनेअंतर्गत लाभ मिळणेकरीता समुचित यंत्रणेकडे अर्ज केलेला नाही.

-----------------

## खेर्डी (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) येथील चिपळूण पॉवरलूम विव्हर्स को.ऑ. सोसायटीच्या भागधारक कामगारांच्या समस्यांबाबत

**(२२) * १२३१९६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये चिपळूण तालुक्यातील ४८ गिरणी कामगार सभासद व श्री.अरविंदभाई मफतलाल तसेच कोंकण विकास महामंडळ असे एकूण ५० सभासद असलेली चिपळूण पॉवरलूम विव्हर्स को. ऑ .सोसायटी या संस्थेची कापड गिरण सन १९७१ मध्ये सुरू झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची गिरणी सन १९८२ मध्ये सूत पुरवठा बंद झाल्यानंतर व श्री.अरविंद मफतलाल यांनी त्यांचे समभाग काढून घेतल्यानंतर या गिरणीची जबाबदारी कोंकण विकास महामंडळ व भागधारक कामगार यांचेवर आल्यानंतर त्यांनी काही काळ ही गिरणी सुरू ठेवली होती परंतू थकीत देण्यांमुळे सन १९९१ मध्ये महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई यांचेकडून भागधारकांच्या अपरोक्ष लिलाव केला गेला व गिरणी कायमस्वरुपी बंद झाली असल्याने भागधारक कामगार आर्थिक संकटात सापडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गिरणीच्या इमारतीमध्येच संबधित भागधारक अद्याप वास्तव्यास असून सदरच्या इमारती अत्यंत जीर्ण व धोकादायक स्थितीत

असल्याने त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी त्यांचेकडून होत असून याबाबत मा.उद्योग मंत्री यांचेकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही. तथापि चिपळूण पॉवरलूम विव्हर्स को.ऑ. सोसायटी अशा नावाने संस्था नसून चिपळूण यंत्रमाग सहकारी संस्था मर्या. चिपळूण ता. चिपळूण जिल्हा रत्नागिरी या नावाने संस्था सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. चिपळूण यांचेकडे नोंदणी क्र. ११३, दिनांक १५/०५/१९७२ अन्वये नोंदविलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर संस्थेकडून महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई यांचे येणे बाकी होते. त्यामुळे महामंडळाने राज्य वित्तीय महामंडळ कायदा १९५१ च्या कलम २९ अन्वये ताबा घेवून सदर संस्थेची तारण मालमत्ता सन १९९३ मध्ये लिलावात विकली आहे.

सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. चिपळूण यांनी दिनांक ०१/१२/२००३ च्या अंतिम आदेशान्वये अवसायनात घेतलेली आहे.

आवसायकास दप्तर न मिळाल्याने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.चिपळूण यांच्याद्वारे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये दिनांक २/११/२०१७ अन्वये तहसिलदार चिपळूण जि.रत्नागिरी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(३) असे कोणतेही निवेदन/पत्र मा.मंत्री उद्योग यांचेकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे धडक सिंचन योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या विहिरीवर विद्युत जोडणी करुन देण्याबाबत

**(२३) * १२४५४१ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे धडक सिंचन योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या विहिरीवर दोन वर्षे होऊनही अद्यापपर्यंत विद्युत जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतातील विहिरीवर तातडीने विद्युत पुरवठा करण्यात यावा अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी उप विभागीय अभियंता, महावितरण यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचनापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तातडीने विद्युत जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच विद्युत जोडणीस विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अकोला परिमंडळ अंतर्गत वाशिम जिल्हयातील मालेगाव तालुक्यामध्ये धडक सिंचन योजनेअंतर्गत एकूण ७८६ लाभार्थी होते. त्यापैकी ४५१ ग्राहकांनी कृषीपंपाच्या विद्युतीकरणासाठी अर्ज केले होते. त्या सर्व ४५१ लाभार्थ्यांची अंदाजपत्रके मंजूर करुन त्यांना पैशाचा भरणा करण्याकरिता महावितरण कंपनीमार्फत कोटेशन देण्यात आले. त्यापैकी एकूण २५५ लाभार्थ्यांनी कोटेशनचा भरणा केलेला आहे. २५५ लाभार्थ्यांपैकी २३० लाभार्थ्यांची कामे माहे मे, २०१८ पूर्वी करण्यात आली. उर्वरित लाभार्थ्यांची कामे कंत्राटदारास देण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधित शेतकऱ्यांना तातडीने विद्युत जोडणी देण्याबाबत महावितरण कंपनीने कंत्राटदारास कार्यादेश दिले असून सदर विद्युत जोडणीची कामे माहे डिसेंबर, २०१८ अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काटकुंभ (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील १२ गावांमध्ये महावितरण कंपनीच्या अभियंत्यानी ५ महिन्यांचे एकत्रित विज देयक दिल्याबाबत**

**(२४) * १२४१५७ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटकुंभ (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील १२ गावांमध्ये महावितरण कंपनीचे अभियंता यांनी गेल्या सहा महिन्यांचे विजेचे देयक गावकऱ्यांना दिले नसून आता अचानकपणे पाच महिन्यांचे विज देयक देवून वसूली केली जात असून सदर देयक न भरल्यास विजेचे कनेक्शन बंद केले जात असल्याची बाब दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीने दरमहा ग्राहकांना विज देयक देवून वसूल न करता आता अचानकपणे पाच महिन्यांचे देयक दिल्यामुळे त्यांना एवढी रक्कम भरणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ दिव्यांगाना मिळण्याबाबत

**(२५) * ११९८०२ श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात प्रशासकीय स्तरावर दिव्यांग व्यक्तींसाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ दिव्यांगाना देण्यात यावा यासाठी दिव्यांग संघटनेच्यावतीने तहसीलदार, पांढरकवडा यांना निवेदनान्वये मागणी करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगांच्या कल्याणासाठी समाजकल्याण विभागामार्फत असंख्य योजना राबविल्या जात असल्याने स्वयंरोजगारासाठीच्या योजनेकरिता शासनाकडून यावर्षी १९ लाख ५० हजार इतकी तरतुद करण्यात आली असून यामध्ये २.५० लक्ष निधी अखर्चित राहिला असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राबविण्यात येणाऱ्या निधीबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकारी लाभार्थ्यांची निवड झाल्याचे सांगून डीबीटी अंतर्गत लाभ देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांगांच्या निवेदनाच्या अनुषंगाने विविध मागण्यांची पुर्तता करण्यासाठी तसेच निधी अखर्चित राहिल्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) पांढरकवडा जि.यवतमाळ पंचायत समितीला सन २०१७-१८ मध्ये उप कराद्वारे ७९०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली असुन त्यापैकी ३ टक्के रू.२८५००/- इतकी रक्कम दिव्यांगासाठी राखून ठेवण्यात आली आहे. सदर रकमेतुन लाभार्थ्यांना शिलाई मशीन देण्यात येणार असून ५ लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. प्रती लाभार्थी ५७००/- प्रमाणे थेट खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत

**(२६) * १२४५२० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील विळे भागाड, तासगाव, येलवडे या भागातील स्थानिक प्रकल्पग्रस्त यांनी त्यांच्या पाल्यांना रोजगार मिळावा व गावांचा विकास व्हावा या हेतूने आपल्या जमिनी कमी भावाने औद्योगिक क्षेत्रासाठी दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विळे भागाड औद्योगिक वसाहतीतील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने स्थानिकांना नोकरीमधून डावलल्याने तसेच इतर मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीतील वाहतुकीचे काम मिळावे म्हणून सई इंटरप्रायजेस आणि ए.के. लॉजिस्टीक या स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या कंपनीने नोंदणी करूनही सदर कंपनीने माल वाहतुकीचे काम त्यांना न देता बाहेरील २२ वाहतूकदार कंपन्यांना दिले असून अन्य जिल्हयातील १२ कंपन्यांना उप ठेकेदार म्हणून सदर कंपनीत काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याबाबत व माल वाहतुकीचे काम स्थानिक कंपनीला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

विळे भागाड औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी ता.माणगाव जि.रायगड येथील मौजे वरचेवाडी, सणसवाडी, भागाड, तासगाव व येलवडे येथील खाजगी ७२१.३०६ हे. आर. व शासकीय ५१.४१३ हे. आर. असे एकूण ७७२.७२ हे. आर. क्षेत्र दिनांक ०२/१२/१९८८ रोजी अधिसूचित करण्यात आले व महामंडळास ७४७.०७ हे. आर. क्षेत्राचा ताबा प्राप्त झालेला आहे. सदर भूसंपादनासाठी एकूण ६४० शेतकऱ्यांच्या जमीनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. विळे भागाड औद्योगिक क्षेत्रासाठी २६ वर्षापुर्वी जमीनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. सदर जमीनीस तत्कालीन मुल्यांकनाप्रमाणे प्रती हेक्टर खरीप जमीनीकरिता रुपये ७५०००/- माळ वरकस जमीनीकरिता रुपये ६०,०००/- व पोट खराबा जमीनीकरिता रुपये १५००/- असा दर दिलेला आहे.

(२) व (३) निवेदन दिले हे खरे आहे.

मे.पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा.लि. माणगाव येथे मोठा उद्योग घटक स्थापन असून, घटकाने माहे जून २०१८ अखेर सादर केलेल्या स्थानिक लोकांना रोजगार प्रपत्र-१ नुसार घटकामध्ये ६५७ रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्यामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत एकूण ८६ रोजगार उपलब्ध असून त्यामध्ये स्थानिकांची संख्या ७१ असून त्याचे प्रमाण ८३% एवढे आहे. तसेच पर्यवेक्षकीयसह इतर श्रेणीत एकूण ६५७ रोजगार उपलब्ध असून त्यामध्ये स्थानिकांची संख्या ५३७ असून त्याचे प्रमाण ८२% एवढे आहे. शासन निर्णय दिनांक १७/११/२००८ नुसार उपरोक्त नमूद औद्योगिक घटकाने पर्यवेक्षकीय श्रेणीत आवश्यक ५०% व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत आवश्यक ८०% इतके प्रमाण राखल्याचे निदर्शनास येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वारंगा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे लाईनमनचा झालेला मृत्यू

**(२७) * १२२५३४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारंगा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे दुरुस्तीचे काम करीत असतांना विद्युत खांबावरुन पडून श्री.बापुराव सिताराम ढोले या लाईनमनचा मृत्यू झाल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कळमनुरी शहरातील शास्त्रीनगर भागातील शेतमजूर श्री.सुनील रामजी पातोडे यांचा शेतातून घराकडे येत असतांना तुटलेल्या विदयुत तारेचा स्पर्श होऊन मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या दोन्ही घटनांबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार मृत लाईनमनच्या व शेतकऱ्याच्या कुटूंबियास आर्थिक मदत देण्याबाबत व शास्त्रीनगर भागातील शेतमजूराच्या मृत्यूस जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) विद्युत निरीक्षक, हिंगोली यांच्या अहवालानुसार सदर अपघात महावितरण कंपनीच्या विद्युत संचमांडणीवर घडलेला नाही.

(३) प्रश्न १ मधील घटनेमध्ये संबंधित वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी सुरक्षा साधनांचा वापर न करता काम केले असल्याने ते सदर अपघातास स्वत: जबाबदार असल्याचे तपासात दिसून आले आहे. वारंग शाखेतील कार्यरत असलेले लाईनमन श्री.ढोले यांच्या कुटुंबियास तातडीची आर्थिक मदत कंपनीच्या नियमाप्रमाणे रु.४०,०००/- दिनांक ०५.०५.२०१८ रोजी धनादेशाव्दारे देण्यात आली आहे. तसेच प्रश्न २ मधील घटनेमध्ये श्री.सुनिल रामजी पातोडे विद्युत धक्का बसून प्राणांतिक अपघात घडला असे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट होते. परंतु अपघात स्थळी महावितरण कंपनीच्या एल.टी.लाईनच्या कुठल्याही तारा तुटल्या नसल्याचे दिसून आले आहे त्यामुळे महावितरण कंपनीच्या विद्युत संच मांडणीवर सदरचा अपघात घडलेला नसल्याने याप्रकरणी नुकसान भरपाई देय होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी चालविल्या जाणाऱ्या केंद्रीय निवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(२८) * ११८६६० श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीमधील मुला-मुलींसाठी चालविल्या जाणाऱ्या ३२२ केंद्रीय निवासी आश्रमशाळांना अनुदान देण्यात येत नसल्याने संस्थाचालकांनी मंत्रालयासमोर सामुहिक आत्मदहनाचा इशारा दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३२२ आश्रमशाळांपैकी १६० शाळांना अनुदान देण्यासंदर्भातील प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रस्तावाला मंजूरी देऊन आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आश्रमशाळा या योजनेकरीता राज्य शासनाने शिफारस केलेल्या ३२२ आश्रमशाळांपैकी ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजुर केलेले आहे.

उर्वरीत आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजुर केलेले नसल्याने या संस्था तसेच मा.लोकप्रतिनिधी यांनी या आश्रमशाळांना राज्य शासनाचे

अनुदान मिळण्याची केलेली मागणी विचारात घेऊन या आश्रमशाळांकरीता राज्याची योजना तयार करुन त्यांना अनुदान देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र २ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांसाठी वाटप केलेल्या भूखंडांना रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत

**(२९) * १२५३३२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ मधे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांसाठी वाटप केलेल्या भूखंडांना अनेक वर्षांपासून रहदारीकरीता रस्ता उपलब्ध नसल्यामुळे त्या ठिकाणी उद्योग सुरु करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर भूखंड उद्योजकांना बदलून देण्याची अथवा त्या ठिकाणी जाणे-येणे करिता रस्ता बनवून देण्याची लेखी मागणी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ पासून सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतरही उद्योजकांना रस्ता उपलब्ध करण्यात आला नाही व वाटप झालेल्या भूखंडाचे पैसे भरण्यास सांगून त्यांचे भूखंड रद्द करण्यात आल्याने भूखंड रद्द करण्यात येवू नये अशी मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने भूखंड बदलून देण्याबाबत अथवा रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, अंशत: खरे आहे.

बहुतांश उद्योजकांना पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या असून, काही ठिकाणी भूसंपादनासंबंधित समस्यांचे निराकरण न झाल्याने त्या ठिकाणी रस्त्यांचे काम करता आलेले नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) लोकप्रतिनिधीनी भूखंडधारकाला, चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील भूखंड क्र. डी-११७ वाटप झालेला भुखंड रद्द न करता उर्वरित रक्कम बिगरव्याज भरून घेण्याबाबत मागणी केली होती. परंतु वाटपपत्रातील उर्वरित रक्कम विहीत मुदतीत भरणा न केल्याने वाटपपत्र आपोआप रद्द झाल्याचे भूखंडधारकास दिनांक २/५/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तद्नंतर सदर प्रकरणी प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीत ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून पूढील कार्यवाही सुरू आहे. ज्या ठिकाणी प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांच्या भूसंपादनातील समस्या जसे १५ टक्के भूखंड परतावा, निवासी भूखंड वाटप, जमीन वगळण्याची मागणी इत्यादी समस्यांचे निराकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकलहरे (ता.जि.नाशिक) येथील ६६० मे. वॅट औष्णिक विद्युत प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(३०) * ११७६६७ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे (ता.जि.नाशिक) येथे मंजूर असलेल्या ६६० मेगावॅट विद्युत प्रकल्पाचे काम सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्पातील तिनही संच जीर्ण झाल्यामुळे या ठिकाणी सन २०११ मध्ये ६६० मेगावॅटच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये ६६० मेगावॅटच्या विद्युत प्रकल्पाचे काम अद्याप प्रलंबित असून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) वर्ष २०१७ च्या सुधारित नियोजनानुसार खालील कारणांमुळे सद्य:स्थितीत हा प्रकल्प महानिर्मिती कंपनीने स्थगित ठेवला आहे :-

• सदर प्रकल्पासाठी आवश्यक उंचीचे धुरांडे (Chimney) बांधकामास "विमानपतन ना-हरकत परवाना" प्राप्त करण्यासाठी संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून प्रलंबित आहे. महानिर्मिती कंपनीकडून याबाबत संबंधित प्राधिकरण, केंद्र सरकार यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे.

• सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या कोळश्याची पुरवठा किंमत (Logistics Cost) लक्षात घेता, ऊर्जा निर्मितीचा अस्थिर आकार (Variable cost) मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

• राज्यातील वीज निर्मितीची सध्याची तसेच भविष्यातील परिस्थिती लक्षात घेता आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग (MERC) यांचे निर्मिती प्रेषणा संदर्भातील धोरणामुळे i.e.Merit Order Dispatch (M.O.D.) जास्त अस्थिर आकार (Variable cost) असलेल्या या प्रकल्पामधून ऊर्जा निर्मिती करणे व्यवहार्य होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहात कार्यरत तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३१) * ११७८१६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहात आठ ते दहा वर्षांपासून रोजंदारी व तासिक तत्वावर तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी कार्यरत असून त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे व तद्नंतर भरती प्रक्रिया शासनाने राबवावी या मागणीसाठी धुळे येथील अक्कलकुव्याहून निघालेला मोर्चा पिंपळनेरहून नाशिकला पदयात्रेने गेल्याचे माहे मार्च, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री तसेच आदिवासी विकास विभागाच्या सचिवांच्या उपस्थितीत बैठकही झाली होती त्यामध्ये रोजदांरी, तासिका, मानधन तत्वावरील कर्मचा-यांना शासन सेवेत कायम करण्यासह नोकरीत सुरक्षा प्रदान करण्याचे आदेश दिले होते परंतू यानुसार अद्यापही उचित कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील तासिका तत्वावरील शिक्षक व मानधनावरील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी मा.मंत्री, आदिवासी विकास व मा.मुख्यमंत्री यांना निवेदने देऊन सेवेत कायम करण्याची विनंती केली आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या शिष्टमंडळासोबत दि.२९.०३.२०१८ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास यांच्यासोबत बैठक झाली. सदर बैठकीमध्ये तासिका तत्वावरील शिक्षक व मानधनावरील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भरतीप्रकीयेव्दारे सेवेत घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत

झालेल्या चर्चेस अनुसरुन सध्याच्या भरती प्रक्रीयेमध्ये स्थानिक उमेदवार, आदिवासी भाषेचे ज्ञान, संबंधित पदावरील सेवेचा अनुभव अशा बाबींचा प्राधान्याने विचार करुन भरती प्रक्रीया राबविण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणण्यासाठी अभिप्रायार्थ सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर केलेला आहे. त्यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्यात येणार आहे.

-----------------

## अकोला जिल्हयातील रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याबाबत

**(३२) * १२११४३ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील शहरी व ग्रामिण भागात रमाई घरकुल योजनेतील लार्भाथ्यांची संबंधित अधिकारी आर्थिक फसवणूक करत असून बाळापूर पंचायत समिती येथे एका लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद क्षेत्रासाठी माहे मार्च २०१८ मध्ये निधी वितरीत करण्यात आला असून याच जिल्हयातील पाच नगपरिषद क्षेत्रात अद्यापही घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वाटप करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) सन २०१७-१८ या वर्षात अकोला जिल्ह्यातील नगर परिषदांसाठी निश्चित केलेल्या १३७१ उद्दिष्टांच्या अनुषंगाने समितीने १२९८ घरकुले मंजुर केली आहेत. त्यानुसार २० घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले आहे. १७७ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. १०९९ घरकुलांचे बांधकाम सुरु झाले नसून २ घरकुलांचे बांधकाम रद्द करण्यात आले आहे. सदरहू घरकुलांच्या बांधकामासाठी मंजुर रक्कम रु.१०४२.५० लक्ष निधी संबंधित यंत्रणेस वितरीत करण्यात आला असून नगर परिषद स्तरावरुन पात्र लाभार्थ्यांना घरकुल अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अवैध सावकारांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) * १२१५४९ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अवैध सावकारी करणाऱ्या सुमारे २६ सावकारांवर छापे टाकण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध सावकारी प्रकरणांच्या अनुषंगाने कर्जाबद्दल प्रतिभूती म्हणून घेतलेल्या जमिनींचे खरेदी खत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(२) नुसार अवैध घोषित करुन जमीन मुळ मालकास परत करण्याबाबत जिल्हा निबंधक, वाशिम यांनी आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा निबंधक, वाशिम यांनी दिलेल्या आदेशास अनुसरुन राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये तसेच उक्त प्रकरणातील दोर्षीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) वाशीम जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८(२) अन्वये ५ प्रकरणांमध्ये ४.५८ हे. जमीन मुळ मालकांना परत करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

(३) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ राज्यात लागू झाल्यानंतर जून, २०१८ अखेर अधिनियमाच्या कलम १८ (२) अन्वये कार्यवाही करुन १५९ प्रकरणांमध्ये एकूण २८३.११ हे. जमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे. तसेच अवैध सावकारी प्रकरणी २९२ सावकारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या थकीत पाणी आणि वीज देयकांबाबत

**(३४) * १२३७३९ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती व ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांची ५० टक्के थकीत पाणीपुरवठा आणि वीज देयके १४ व्या वित्त आयोगातून भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने आदेश निर्गमित करुन सुध्दा राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांची ही वीज देयके थकीतच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत व शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्राम विकास विभाग व नगरविकास विभाग यांच्याकडे, थकीत वीज देयकाच्या मूळ थकबाकीची ५०% रक्कम महावितरण कंपनीकडे भरण्याबाबत, पाठपुरावा सुरु आहे. तसेच ग्राहकाने भरणा करण्यासाठी महावितरण कंपनी मार्फत सुलभ हप्ते देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील गरजू, निराधार व विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(३५) * १२३८२९ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये गरजू, निराधार व विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी म्हणून पात्र ठरण्याकरिता रु.२१,०००/- च्या उत्पन्न दाखल्याची अट शासनाने घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उत्पन्न दाखल्याची रु.२१,०००/- ची मर्यादा ही अत्यल्प ठरत असून ज्या गरजू, निराधार व विधवा महिलांचे उत्पन्न रु.२१,०००/- पेक्षा जास्त आहे अशांना तहसिलदार कार्यालयाकडून उत्पन्नाचा दाखला दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी गरजू, निराधार व विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्याकरीता उत्पन्न मर्यादा वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) संजय गांधी निराधार अनुदान योजनेची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेंबळ (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथे कंरजी पॉवर ग्रीडपासून भूगावपर्यंत विद्युत वाहिनीचे टॉवर मनमानीपणे टाकले जात असल्याबाबत

**(३६) * १२२१२५ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंबळ (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथे कंरजी पॉवर ग्रीडपासून भूगावपर्यंत (जि.वर्धा) २२० के.व्ही. मल्टी सर्किट अती उच्चदाब विद्युत वाहिनीच्या टॉवरचे काम सुरू असून सदर टॉवर शेतकऱ्यांच्या शेतात टाकले जात असून त्यांना योग्य मोबदला न देता जबरदस्तीने टाकले जात असल्याचे दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टॉवर उभारणीला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असता संबधित कंत्राटदाराने शेतकऱ्यांना मारहाण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महापारेषण कंपनीकडून २२० के.व्ही. वर्धा-२ (भूगाव) ते २२० के.व्ही. वरोरा या वाहिनीवर नविन ४०० के.व्ही. वरोरा उपकेंद्रापर्यंत लिलो पध्दतीने १०.५ कि.मी. २२० के.व्ही. बहुपथ वाहिनी उभारण्यात येत आहे. सदर वाहिनीचे काम डिसेंबर, २०१७ पर्यंत सुमारे ९५ % काम पूर्ण झाले आहे. मौजे शेंबळ येथील मनोरा उभारण्याचे काम सन २०१५-१६ मध्ये पूर्ण झाले आहे. वाहिनीचे उर्वरित तारा ओढण्याचे काम सुरु असताना मौजे शेंबळ येथील एका शेतकऱ्यांने नुकसान भरपाई पोटी अवास्तव व नियमबाहय रक्कमेची मागणी करत तीव्र विरोध केल्याने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशानुसार पोलीस बंदोबस्तात काम सुरु करण्यात आले.

(२) व (३) पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी  दिलेल्या अहवालाप्रमाणे संबंधित कामगार व शेतकरी यांनी परस्परांविरुध्द तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलीस स्टेशन वरोरा जि.चंद्रपूर येथे एफ.आय.आर. क्र.४५५/१८ कलम ३२४, ५०४, २९४ अन्वये गुन्हा दाखल झालेला असून दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही पोलीसांकडून सुरु आहे.

तसेच एफ.आय.आर. क्र. ४९७/१८ कलम ३२५, ३४ अन्वये गुन्हा दाखल झालेला असून दोषारोप पत्र क्र.७४/२०१८ दिनांक ०५.०६.२०१८ रोजी पोलीसांनी दाखल केले आहे व सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दरेगांव (ता.सिंदखेडा, जि.बुलढाणा) येथील रमाई घरकूल योजनेच्या प्रतिक्षा यादीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

**(३७) * १२०६३३ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गट ग्रामपंचायत दरेगांव (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील रमाई घरकूल योजनेतील सन २०१७-१८ मधील प्रतिक्षा यादीमध्ये पंचायत समितीकडे पाठविलेल्या प्रस्तावात अनियमितता झाल्याबाबत दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी, सिंदखेडराजा, बुलढाणा यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे

(२) रमाई आवास योजनेच्या प्रतिक्षा यादीमध्ये अनु.क्र.१ वर असलेल्या व्यक्तीकडे बँकेचे पासबूक नसल्याने त्याचा प्रस्ताव सादर न करता प्रतिक्षा

यादीमध्ये क्र.२१ व क्र.८२ वर असलेल्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर करण्यात आलेले आहेत. परंतु सदर दोन्ही प्रस्तावास पंचायत समिती स्तरावरुन अध्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती, सिंदखेडा यांनी ग्रामपंचात सचिव यांना प्राध्यान्य क्रमानुसारच प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक ०७.०६.२०१८ अन्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत

**(३८) * १२३७९२ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीचा प्रस्ताव गत पाच वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे विद्यार्थ्यांना सोयी-सुविधांनी युक्त हक्काची शाळा व वसतिगृहाच्या इमारतीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीचा प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) शासकीय आश्रमशाळा, डोलीवली येथे आश्रमशाळेच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला नाही.

सदर आश्रमशाळा सद्यस्थितीत भाडेतत्वावरील इमारतीत सुरू असून तेथे स्नानगृह, शौचालय, विज, पाणी इत्यादी पुरेशा मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत.

(३) व (४) सदर आश्रमशाळा इमारत बांधणेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## सहकारी औद्योगिक वसाहतींना खेळत्या भांडवलाच्या रकमेवर शुल्क भरावे लागत असल्याबाबत

**(३९) * १२३११५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी औद्योगिक वसाहतींच्या खेळत्या भांडवलाच्या एकूण रकमेवर लेखारिक्षण फीची आकारणी करण्यात येत असून त्यामुळे सहकारी औद्योगिक वसाहतींना प्रतिवर्षी लाखो रुपये लेखापरिक्षण शुल्क भरावे लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या वर्षाचे लेखापरिक्षण होत आहे फक्त त्याच वर्षात झालेल्या एकूण उलाढाल रकमेवर लेखापरिक्षण फी आकारणी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दि.२९/१०/२०१४ नुसार खेळत्या भांडवलाच्या एकुण रक्कमेवर लेखापरिक्षण फी आकारण्याची तरतूद आहे तसेच लेखापरिक्षण शुल्काची महत्तम मर्यादा रु.३.०० लाख इतकी निर्धारित केलेली आहे.

(२) होय.

(३) ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१(१)(फ) व नियम १९६१ चे नियम ७४ मध्ये झालेल्या

बदलास अनुसरुन लेखापरिक्षण शुल्क निश्चितीसाठी एक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीत सहकारी संस्थांचे प्रतिनिधीचा समावेश होता. सदर समितीच्या शिफारशी नुसार वर्षाखेरच्या खेळत्या भांडवल रक्कमेवर लेखापरिक्षण शुल्क आकारण्याबाबत दि.२९/१०/२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

मा.लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने संबंधीत अर्हताधारक लेखापरिक्षकास किमान उचित मोबदला मिळणे आवश्यक असल्याने खेळत्या भांडवल रक्कमेवर लेखापरिक्षण शुल्क आकारण्याची तरतूद आहे. आर्थिक वर्षात उलाढाल नसल्यास लेखापरिक्षकास किमान लेखापरिक्षण फी मिळणार नाही आणि त्याचा विपरित परिणाम लेखापरिक्षण विहित मुदतीत होण्यावर होईल, असे मा.लोकप्रतिनिधींना दिनांक ०३/०७/२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) लागु नाही.

-----------------

## इनगोंदा (ता.परंडा, जि.उस्मानाबाद) येथील शिवारात विद्युत पुरवठ्याअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान

**(४०) * १२२२३६ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इनगोंदा (ता.परंडा, जि.उस्मानाबाद) येथील शिवारात दोन वर्षांपूर्वी उभारलेल्या डीपीवरुन जाणीवपूर्वक विद्युत पुरवठा दिला जात नसणे तसेच लाईनमन व अधिकारी बेजबाबदारपणे उत्तरे देत असल्याने त्रासलेल्या शेतकऱ्यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन देऊन सामुहिक जलसमाधी घेण्याचा इशारा वीज वितरण विभागाला दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत पुरवठा दिला जात नसल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत व विद्युत पुरवठा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

मौजे इनगोंदा ता. परांडा शिवारातील पाटील डीपीवरुन वीज पुरवठा घेण्याकरिता आवश्यक असलेले डिमांड संबंधित शेतकऱ्यांनी न भरल्यामुळे त्यांना वीजजोडणी देण्यात आलेली नव्हती. अवैध वीजजोडणी तपासणी मोहीमेअंतर्गत उपरोक्त शेतकरी हे अवैधरित्या सदरील रोहित्रावरुन वीज वापरत असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी उपरोक्त निवेदन उपकार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग, परांडा यांना दि.०२.०४.२०१८ रोजी दिले. त्यानंतर त्यांना डिमांड नोटची रक्कम भरण्याबाबत सांगण्यात आले व पैसे भरल्यानंतर सदर शेतकऱ्यांना दिनांक ०४.०४.२०१८ रोजी वीजपुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात महावितरणने आकारलेल्या वीज देयकांतील तफावत वसूल केली जात असल्याबाबत

**(४१) * १२४४८८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात महावितरणने सहा वर्षांपुर्वी वीज देयक आकारणी दरात बदल केलेला असूनही जुन्या दराने आकारणी केली व आता या नवीन दरातील तफावतीचे लाखो रुपयांचे वीज देयक ग्राहकांना देण्यात येऊन वसूल करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कायदा २००३, कलम ५६(२) मधील तरतूदीनुसार गत दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधीतील थकबाकी वसूल करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जुन्या व नवीन वीज देयकातील बदलाची दखल न घेतल्याने लाखो रुपयांचे वीज देयक ग्राहकांना भरावे लागत असून त्यास स्थगिती वा सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, राज्यातील ग्राहकांच्या वर्गवारीनुसार वीज दर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास असून आयोगाने निश्चित केलेल्या वीजदरानुसार महावितरण कंपनीकडून ग्राहकांना वीज बीलाची आकारणी करण्यात येते. मागील सहा वर्षात आयोगाने त्यांच्या दि.१६ ऑगस्ट, २०१२, २६ जून, २०१५ व ०३ नोव्हेंबर, २०१६ अन्वये आदेश पारित करुन महावितरणच्या ग्राहकांना नवीन वीजदर लागू केले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील विद्युत रोहित्र व प्रलंबित कृषी पंपासाठी निधी मिळण्याबाबत

**(४२) * १२२७३६ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील बहुतांश जमिनी उजनी धरण, सिना-कोळंगाव धरण व कुकडी डावा कालवा आदी प्रकल्पातील पाण्यामुळे सिंचनाखाली येत असल्याने विद्युत रोहित्र व शेतकऱ्यांच्या प्रलंबित कृषी पंपाच्या जोडणीसाठी (ए.जी. पेड पेंडींग) रु.१९.२० कोटी निधी मिळावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त तालुक्यातील दहिगांव उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर कार्यान्वित करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री व मा.जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार करमाळा तालुक्यातील प्रलंबित कृषी पंपाच्या जोडणीसाठी निधी मंजूर करण्याबाबत व दहिगांव उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदरचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) राज्यातील पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित कृषी पंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याकरिता दि.०५.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्चदाब वितरण प्रणाली योजना (HVDS) ही नवीन योजना मंजूर करण्यात आली असून सदर योजनेतंर्गत वीज जोडणी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २८.०५.२०१८ रोजीच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने महाऊर्जाकडून अहवाल मागविण्यात आला आहे. याबाबत असेही नमूद करण्यात येते की, राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर आणण्यासाठी सर्व समावेशक धोरण निश्चिती करण्यासाठी ऊर्जा विभागाच्या दिनांक ०६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये, महासंचालक, महाऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्याचबरोबर जलसंपदा विभागाने दिनांक २८.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये, कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. सदर समित्यांकडून शिफारशी शासनास अपेक्षित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जमाफीसाठी असलेल्या जाचक अटी व नियम शिथिल करण्याबाबत

**(४३) * ११९५३० श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी कमी पाऊस व गारपीटीने झालेले नुकसान, कर्ज माफीसाठीचे जाचक असणारे नियम आणि शेतमालाचे कमी झालेले दर आदी कारणांनी आर्थिक संकटात सापडला असल्याने खाजगी सावकारांची मदत घेत असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतंर्गत जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीची मर्यादा दीड लाख रुपयांपर्यंतच असून उर्वरित कर्जाची रक्कम भरल्यानंतरच दीड लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळत असल्याने दीड लाखापेक्षा जास्त कर्ज असणारे शेतकरी खाजगी सावकाराकडून उर्वरित रक्कम घेत असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ च्या तुलनेत राज्यामध्ये सन २०१७ मध्ये खाजगी सावकारांनी वाटप केलेल्या कर्जात २८.७% वाढ झाली असून आकडे पाहिले असता, सन २०१५ मध्ये १२ हजार २२ परवानाधारक सावकार होते त्यात सन २०१६ मध्ये १.५% वाढ झाली असून शासनाचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याने व ते अल्प प्रमाणात मिळत असल्याने राज्यातील बहुतांश शेतकरी खाजगी सावकाराचा आधार घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार कर्जमाफीसाठी असलेल्या उक्त जाचक अटी व नियम शिथिल करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना सावकाराकडे कर्जासाठी जावे लागू नये याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

(३) राज्यामध्ये दिनांक ३१/३/२०१६ अखेर १२,२०८ परवानाधारक सावकारांनी एकूण १०,८६,२५६ शेतकरी व बिगरशेतकरी कर्जदारांना रु. १,२५५ कोटीचे कर्ज वाटप केले असून सन २०१७ मध्ये १२,२१४ सावकारांनी १०,९५,७०१ कर्जदारांना १,६१५ कोटीचे कर्ज वाटप केले आहे. त्यातुलनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँकांनी सन २०१६ मध्ये ५८.४७ लाख खातेदारांना खरीप व रब्बी हंगामासाठी एकूण रु.४०,५८१ कोटीचे कर्ज वाटप केले असून सन २०१७ मध्ये ५७.०८ लाख खातेदारांना दोन्ही हंगामासाठी रु. ४२,१७२ कोटीचे कर्ज वाटप केले आहे. त्यामुळे शेतकरी सावकारांच्या जाळयात अडकत चालला आहे हे म्हणणे संयुक्तिक नाही.

(४) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार सावकारांना परवाने देण्यात येतात. तसेच कायद्याने विहीत केलेल्या दरानुसार व्याज आकारणी करणे सावकारांना बंधनकारक आहे. बेकायदेशीर सावकारीबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुंभेफळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील ३३ के.व्ही.ए. वीज उपकेंद्राचे काम सुरु करण्याबाबत

**(४४) * १२२२३२ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभेफळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील ३३ के.व्ही.ए वीज उपकेंद्रास सन २०१४ मध्ये मंजुरी मिळूनही अद्याप त्याची उभारणी झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर ३३ के.व्ही.ए वीज उपकेंद्राची तातडीने उभारणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) पायाभूत आराखडा योजना-२ अंतर्गत अकोले तालुक्यातील कळसबुद्रुक येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र मंजूर होते. सदरचे काम मे. ईएमसी जेव्ही श्रीनिवास इलेक्ट्रीकल्स यांना देण्यात आले होते. सदर जागेत स्थापत्य कामे चालू असतांना तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या पाईप लाईन, उपकेंद्राच्या जागेच्या खालून जात असल्यामुळे, त्यांनी उपकेंद्राचे काम बंद पाडले होते. त्यानंतर कळसबुद्रुक ऐवजी ३३/११ के.व्ही. कुंभेफळ उपकेंद्रासाठी दि.०५.०७.२०१६ रोजी मंजुरी देण्यात आली. सदर उपकेंद्राची जागा ताब्यात नसल्यामुळे उपकेंद्राचे काम सुरु होऊ शकले नाही. सदरची जागा दि.१६.१०.२०१७ रोजी महावितरणच्या ताब्यात घेण्यात आली आहे.
(३) ३३/११ के.व्ही. कुंभेफळ उपकेंद्राचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महावितरण कंपनीच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत तयार करण्यात आला असून तांत्रिक व आर्थिक तपासणी करुन निविदा काढण्याची मंजुरी महावितरण कंपनीच्या मुख्यालयामार्फत देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील गावांतून टाकण्यात आलेल्या गॅस पाईपलाईन हटविण्याबाबत

**(४५) * ११७७२१ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील विविध गावातून टाकण्यात येणाऱ्या एचपीसीएल कंपनीच्या गॅस पाईपलाईनला विरोध दर्शविण्यासाठी ग्रामस्थांनी दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पेण तालुक्यातील विविध गावातून जाणारी सदर गॅस पाईपलाईन हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पेण तालुक्यातील विविध गावातून टाकण्यात येणाऱ्या गॅस पाईपलाईला विरोध करण्यासाठी सरपंच ग्रामपंचायत दुष्मी व निमंत्रक गॅस लाईन हटाव कृति समिती यांनी दिनांक ०६/०४/२०१८ ते दिनांक ०९/०४/२०१८ पर्यंत उपोषण केले. व्यवस्थापक हिदुस्थान पेट्रोलियम कंपनी लि. व जिल्हा प्रशासनासोबत चर्चा होईपर्यंत काम बंद ठेवणार असल्याचे कंपनीने दिनांक ०८/०४/२०१८ रोजी कळविले आहे. हिदुस्थान पेट्रोलियम कंपनी लि. यांचेकडील दिनांक १९/०४/२०१८ च्या पत्रानुसार उप विभागीय अधिकारी, पेण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी, तहसिलदार पेण, कंपनीचे अधिकारी तसेच गॅस पाईपलाईन हटाव कृति समितीचे सभासद यांचेसमवेत जागेची पाहणी केली. परंतु पाईपलाईनचा मार्ग कोणत्या जागेतून न्यावा याबाबत केलेल्या सर्वे मध्ये कोणताही निर्णय झालेला नाही. सद्या पाईपलाईनचे काम बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप केल्याबाबत

**(४६) * १२३९०० श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप केला असून दुधाच्या दराचा कमी भाव, साखरेचे कमी झालेले दर, मोझांबिक या देशाकडून आयात केलेली तूर आदी मुद्दयांसाठी दिनांक ५ ते १० जून, २०१८ पासून आपल्या विविध मागण्यांसाठी शासनाच्या विरोधात आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागण्यांवर दिनांक १० जून, २०१८ रोजीपर्यंत निर्णय घेऊन दिलासा द्यावा व निर्णय न घेतल्यास शहराचा दूध, भाजीपाला व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा बंद करण्यात येईल असा इशारा शेतकरी संघर्ष समितीने शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या अन्य मागण्या काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने शेतक-यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) शेतकरी संघटना, मालेगांव जि.नाशिक यांचे दि.२.६.२०१८ चे निवेदन शासनास प्राप्त झाले असून त्यामधील मुद्दयाप्रमाणे संबंधित विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## सोलापूर बाजार समितीत झालेला गैरव्यवहार

**(४७) * १२२७७९ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर बाजार समितीचे सन २०११ ते २०१६ या कालावधीतील कामाचे विशेष लेखापरिक्षण करण्यात आले असता सोलापूर बाजार समितीत ३९ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) व (३) विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (जि.म.स.बॅक) सोलापूर यांनी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश दि.३१.७.२०१७ अन्वये सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूरचे दि.१.४.२०११ ते ३१.३.२०१६ अखेरचे फेर लेखापरिक्षण व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश दि.२५.५.२०१७ अन्वये दि.१.४.२०१६ ते दि.३१.३.२०१७ अखेरचे वैधानिक लेखापरिक्षण केले आहे.

सदर फेर लेखापरिक्षणाचे वेळी त्यांना आढळून आलेल्या १४ मुद्दयामधील गैरव्यवहाराबाबत दि.१.४.२०११ ते दि.३१.१०.२०१६ या कालावधीतील सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूरचे तत्कालीन सभापती, समिती सदस्य व सचिव यांचेवर रूपये ३९,०६,३९,१९३/-एवढया रक्कमेचा गैरव्यवहार केल्याने दि.२२.५.२०१८ रोजी जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे विशेष लेखापरिक्षक,वर्ग-१ सहकारी संस्था, (जि.म.स.बॅक), सोलापूर यांनी गुन्हा दाखल केला आहे. तसेच फेर लेखापरिक्षण अहवालात आढळून आलेल्या एकूण रू.३९,०६,३९,१९३/- इतक्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेबाबत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूरचे तत्कालीन सभापती, समिती सदस्य व सचिव यांचेवर महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ५७(४) अन्वये एकसदस्सीय न्यायाधिकरण का नेमण्यात येवू नये या बाबत नोटीस बजावण्यात आली आहे. सुनावणीअंती नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसंबंधी एकसदस्यीय न्यायाधिकरणाची नियुक्ती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य घेणाऱ्या सहकारी सूतगिरण्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४८) * ११७३१२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य घेणाऱ्या १३० पैकी केवळ ७ सहकारी सूतगिरणी गेल्या पाच वर्षांत नफ्यात असून, बहुतांश प्रकरणात या गिरण्यांनी शासनाच्या भाग भांडवलाची परतफेड केली नसल्याने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या अहवालात नमूद केले असल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुतगिरण्यांनी सभासद शेतकऱ्यांकडील कापूस खरेदी करणे आवश्यक असूनही प्रत्यक्षात अनेक गिरण्यांनी राज्याबाहेरील व्यापारांकडून कापूस खरेदी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित सूतगिरण्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचे ३०/६/२०१७ रोजीच्या अहवालात मार्च, २०१६ अखेर राज्यातील १३० सहकारी सूतगिरण्यापैकी ६७ सूतगिरणी उत्पादनाखाली असून त्यापैकी ७ सूतगिरणी नफ्यात असल्याचे नमूद केले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

९७ व्या घटनादुरूस्तीनुसार राज्यातील सहकारी सूतगिरण्यांनी आदर्श उपविधी स्वीकारली असून सदर उपविधीमध्ये, सहकारी सूतगिरण्यांनी कापूस उत्पादक सभासदांकडून, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ/कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया तत्सम एजन्सी कडून एकत्रीत दर पध्दतीनुसार कापूस खरेदी केला जाईल मात्र कोणत्याही परिस्थितीत प्रकीयेकरीता कापूस खरेदी करताना प्रथम प्राधान्य कापूस उत्पादक सभासदांना देण्यात येईल असे नमूद केले आहे.

राज्यातील उत्पादनाखालील असलेल्या सूतगिरण्यांचा मागील पाच वर्षातील कापूस गाठी खरेदी संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | विभाग | कापूस गाठी खरेदी सभासद) | कापूस गाठी खरेदी (राज्य अंतर्गत) | कापूस गाठी खरेदी (राज्याबाहेरील) |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | १९७१८ | ६१४८७१ | ६९१२ |
| २ | औरंगाबाद | ७०३२ | ७८५५५ | ४९६६ |
| ३ | मुंबई | १४९९४९ | १०९२८३० | १८५०६ |
| ४ | सोलापूर | २७९२ | २४२४७८१ | १०३६४५ |
| | एकूण | १७९४९१ | ४२११०८७ | १३४०२९ |
| | | | एकूण - | ४५२४६०७ |

उपरोक्त नमूद तक्त्यात एकूण खरेदी ४५२४६०७ कापूस गाठीची असून राज्याबाहेरीत कापूस खरेदी १३४०२९ एवढया गाठीची आहे. त्यामुळे राज्याबाहेरील कापूस खरेदीचे प्रमाण एकूण खरेदीच्या २.९६ टक्के एवढे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हरळी, बटकणंगते (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे अवैध मद्‌यसाठा जप्त केल्याबाबत

**(४९) * १२६२५० श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरळी, बटकणंगते (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे लाखो रुपयांचा अवैध मद्‌यसाठा माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अवैध मद्‌य विक्री थांबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

उक्त गावाच्या हद्दीत दि. २४/०५/२०१८ रोजी गोवा बनावटी दारुच्या ५ बॉक्सची वाहतुक मोटरसायकल वरुन करताना एक इसम आढळून आला आणि रस्त्याच्या कडेला झाडाखाली गोवा बनावटीचे विदेशी मद्याचे विविध ब्रॅन्डचे ३० बॉक्स आढळून आले. यामध्ये संबंधिताविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये दुय्यम निरीक्षक, गडहिंग्लज यांनी अनुक्रमे गु.र.क्र ९६/२०१८ व गु.र.नं. ९७/२०१८ असे दोन गुन्हे नोंदविण्यात येऊन एकूण रु.२,३२,६८०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

(३) अवैध मद्यविक्री थांबविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

अ) गोवा बनावटीच्या मद्याची अवैध वाहतूक थांबविण्यासाठी त्या राज्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर तात्पुरते तपासणी नाके बसविण्यात आले आहेत.

ब) अवैध मद्याच्या वाहतुकीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

क) सराईत गुन्हेगाराकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यात येत आहे.

ड) ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याबाबत सर्व ग्रामपंचायतींना अवगत करण्यात आले आहे.

इ) पोलीस विभागाच्या समन्वयाने कारवाई करण्यात येते.

ई) अवैध मद्याच्या धंद्यावर कारवाई करण्यासाठी मुख्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच अवैध मद्याच्या तक्रारीसाठी व्हॉटसअप क्रमांक ८४२२००११३३ व टोल फ्री क्र. १८००८३३३३३३ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या शाळांना १००% अनुदान मिळण्याबाबत

**(५०) * १२३७५९ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या तपासणी निकषाप्रमाणे पात्र असलेल्या १६४ शाळांचा कायम विनाअनुदान हा शब्द काढून १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात यावे तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी यासह अन्य मागण्यांकरिता दिव्यांग शाळा संघटनेच्यावतीने मुंबई येथील आझाद मैदानावर दिनांक २४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दिव्यांग शाळा संघटनेच्या मागण्यांची पुर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) सदर शाळांचा कायम शब्द वगळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## वाशी (जि.उस्मानाबाद) येथील विन्ड वर्ल्ड इंडिया या कंपनीने शेतकऱ्यांकडून नाममात्र दराने जमिनी विकत घेतल्याबाबत

**(५१) * १२२२६२ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (जि.उस्मानाबाद) येथे वीजनिर्मिती करण्यासाठी विन्ड वर्ल्ड इंडिया या कंपनीने मागील ५ वर्षांपूर्वी शेतकऱ्यांकडून कमी दराने जमिनी विकत घेतल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत या कंपनीकडून एक युनिटही वीजनिर्मिती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.उर्जा मंत्री यांच्याकडे लेखी स्वरुपात केलेली असून या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार कंपनीवर कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी परत देण्याबाबत वा जमीनीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विंड वर्ल्ड लिमिटेड या कंपनीने स्थानिक स्तरावर खाजगी जमिन मालकांकडून जमिनी खरेदी खताने व करारावर घेतल्या आहेत.
(२) सदर प्रकल्पाची वीज निर्मितीच्या अनुषंगाने प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे झालेली नाही. त्यामुळे प्रकल्प कार्यान्वित झाल्याची नोंदही महाऊर्जाकडे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) या संदर्भात महाऊर्जाकडून अहवाल मागविण्यात आला असता, त्यानुसार प्रश्नाधीन जमिन खरेदी व्यवहार हा विंड वर्ल्ड इंडिया कंपनी व खाजगी जमिन मालक यांच्यातील असल्याने यातील विवाद सक्षम न्यायालयाच्या कार्यकक्षेत येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.